परिशिष्ट

# द. ता. भोसले यांची मुलाखत

# परिशिष्ट

## द·ता·भोसले यांची मुलाखत

"अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या कथासंग्रहांचे लेखक, आदरणीय डॉ·द·ता·भोसले हे माझ्या छ·शिवाजी कॉलेज, सातारा येथे मराठी विभागप्रमुख होते· त्यामुळे त्यांच्याशी बोलण्याचा व प्रत्यक्ष भेटीचा अनेकदा योग आला· त्यांच्या मार्गदर्शनाने अध्ययन करण्याचे भाग्य लाभले याचा मला सार्थ अभिमान आहे· प्रस्तुत संशोधन, अभ्यासाच्या संदर्भात त्यांनी मला आपली मुलाखत देऊन, माझ्या मनातील अनेक शंका-कुशंकांचे निर्सन केले व माझ्या अभ्यासाला योग्य दिशा प्राप्त करून दिली·

सध्या ते पंढरपूर येथे आपल्या निवासस्थानी लेखन, वाचन, चिंतन या संदर्भात आपला उर्वरित वेळ सार्थकी लावतात· माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शनाचा लाभ देतात· पंढरपूरला जाऊन त्यांच्या निवासस्थानी मी त्यांची मुलाखत घेतली· यावेळी त्यांच्या आतिथ्यात आणि बोलण्यातही मला प्रादेशिकतेच्या खूणा आढळल्या· साहित्य हे व्यक्तिमत्त्वापासूनही वेगळे नसते याचीही मला प्रतिती आली· त्यांनी दिलेली मुलाखत मी जशीच्या तशी इथे सादर करीत आहे·

या मुलाखतीमुळे प्रस्तुत कथासंग्रहांचा प्रादेशिक अंगाने अभ्यास करण्याच्या दृष्टीने, लेखक म्हणून त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व समजण्याच्या दृष्टीने तसेच त्यांच्या साहित्याबाबतच्या व्यक्तिगत आणि वाङ्मयीन जीवनजाणीवांवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने, या मुलाखतीचा मला उपयोग झाला·

1· आपले बालपण कोठे आणि कसे गेले? आपल्या पूर्वजीवनाबद्दल तथा विद्यार्थी दशेबद्दल विशेष माहिती·

माझे बालपण पंढरपुर तालुक्यातील सरकोली या गांवी अतिशय गरिबीत आणि दारिद्र्याशी झगडत गेले· विविध प्रकारची कष्टाची आणि मजूरीची कामे करीत शिक्षण घ्यावे लागले· एम्·ए· पर्यत अशाप्रकारे पडेल ती कामे करून शिक्षण घेतले·

विद्यार्थी देशत, विद्यार्थी म्हणून प्रथमपासूनच हुशार होतो· हायस्कूलमध्ये सतत प्रथम क्रमांक असायचा· एस्·एस्·सी· ला पंढरपूर केंद्रात प्रथम आलो· वसतीगृहात जीवन काढले· अनाथ, निराधार व गरीब यामुळे शिक्षण घेताना उपासमार, अडचणी आणि उपेक्षा वाटयाला आली· पुढे मित्रांनी यथाशक्ती सहकार्य दिले· काही प्राध्यापकांचाही आधार मिळत गेला·

2· आपण कथालेखनाला कधीपासून सुरूवात केली? आपण लिहलेली पहिली कथा कोणती?

दरम्यान 1960 सालापासून मी कथालेखनास सुरूवात केली· म्हणजेच विद्यार्थीदशेपासूनच कथालेखनास प्रारंभ केला· नागपूरचे "सुषमा" आणि पुण्याचे "साप्ताहिक स्वराज" यांमधून माझ्या कथा-कविता प्रसिध्द होऊ लागल्या·

एस्·वाय·बी·ए·ला असताना "रोहिणी" मासिकात माझी "बेवारस" नावाची पहिली कथा प्रसिध्द झाली, हिच मी सर्वप्रथम लिहलेली कथा·

3· लेखनासाठी कथालेखन हाच वाड्मयप्रकार आपण अधिक्यानं का हाताळला?

कथा फॉर्ममधून व्यक्त करण्याजोगे अनुभव माझ्याकडं अधिक होते· यापेक्षाही मला, आलेला अनुभव कथा फॉर्ममधून नीटपणे, पूर्णपणे व आटोपशीर रूपात प्रकट करता येतो· त्या अनुभवाचा पिंडही कथेला पोषक असाच असतो· म्हणूनच मी कथालेखक अधिक केले·

4· दारिद्र्यपीडीत-भूकेकंगाल, भिकेकंगाल लोकांचे, मजूरवर्गाचे आणि स्त्रीयांच्या अतिव दुःखाचे चित्रण आपल्या कथांमधून अधिक्याने का आले?

( भूक, दारिद्र्य, शोषण, अज्ञान आणि अन्याय-अत्याचार यांनी नकोसे झालेले जीवनाचे ओझे वाहणारी माणसेच प्रथमपासून पहात होतो· त्यातलाच एक मीही होतो· अशाप्रकारचे अनुभव मी स्वतःही घेतलेले आहेत· आजही मूठभर लोक सोडले तर जीवनमरणाचा लढा देणारी, ही पिचलेली माणसे अधिक पहावयास मिळतात· ) खेडयात तर हा समाज खूप आहे· या पिचलेल्या लोकांच्या जीवनाशी माझे भावनिक नाते जुळते· त्यांच्याशी मी सहजपणे एकरूप होऊन जातो· तो अनुभव मला उत्कटतेने येतो व अस्वस्थ करून सोडतो· स्वाभाविकच हे जग कथांतून अधिक प्रमाणात आलेले आहे· तिच भूमिका स्त्रीचित्रणासंबंधी आहे·

5· आपण विनोदी कथालेखनाकडे कसे वळला?

ग्रामीण जीवनातही विसंगती आढळते· अज्ञान, भाबडेपणा, बेरकीपणा आढळतो· त्यातून परिस्थिती परिणामाने तयार झालेले मानवी स्वभावाचे गंमतशीर नमुने (Types) मला जाणवत गेले· भाबडी, बेरकी व भोळी माणसे सरळपणे जगताना निर्माण होणारी विसंगती, यातून कथा निर्माण झाली· केवळ गंमत म्हणून नव्हे तर, मानवाच्या अस्सल जीवन जाणीवांचा शोध आणि बोध विनोदाच्या साहयानेही घेता येतो· आणि विसंगतीच्या जागी सुसंगतीची अपेक्षा करता येते· यादृष्टीनेच विनोदी कथालेखनाकडे वळलो·

6· ग्रामीण कथांचेच लेखन आपण का केले?

मी ग्रामीण परिसरात वाढलो· माझी जडणघडण त्या वातावरणात झाली· मनावर ग्रामीण मातीचेचे संस्कार झाले· नंतरचे आयुष्यही बहुतांशी ग्रामीण भागात गेले· शहरात राहिलो तरी ग्रामीण विद्यार्थी, शेतकरी यांच्याशी माझा सतत संबंध येत गेला· ग्रामीण संवेदनशीलता हा माझ्या प्रतिभेचा प्रधान धर्म आहे· ग्रामीण जीवनाशी माझा सतत संपर्क असतो· आजही मी ग्रामीण जीवनातंच अधिक रमतो· स्वाभाविकच या ग्रामीण संवेदनशीलतेद्वारे आलेले अनुभव तथा व्यक्ति या ग्रामीण

घडावे व त्यातून आपली अनुभव समृध्दी व्हावी. जीवनजाणीव प्रगल्भ व्हावी, जीवन समजून घेण्यास मदत व्हावी , त्याबरोबरच उच्च प्रतीचा कलात्मक आनंद व्हावा. ही वाचकाची अपेक्षा असली पाहिजे आणि असायला हवी.

9. आपल्या कथा या कोणत्या विशिष्ट जाणीवा सिध्द करण्याच्या हेतूने आपण लिहल्या आहेत?

जीवनातील दुःख, परावलंबित्त्व प्रतीत व्हावे. जीवनाची क्षुद्रता, भव्यता प्रकट व्हावी. जीवनाची, समरसून जगण्याची ओढ प्रतीत व्हावी व त्यातून आपली वाचक म्हणून जाणीव प्रगल्भ आणि व्यापक बनावी - याच अपेक्षा, भूमिका तथा विशिष्ट जाणीवा सिध्द करण्याच्या हेतूने, मी कथा लिहल्या आहेत.

10. झोपडपट्टीय जीवनाचा प्रादेशिकतेत समावेश होत नाही. पण आपल्या कथांतील झोपडपट्टीय जीवनदर्शन हे प्रादेशिक होऊ शकेल का? होत असेल तर का? व नसेल तर का?

व्यापक अर्थाने झोपडपट्टी देखील प्रादेशिकतेमध्ये येऊ शकते. काही समीक्षकांनी या झोपडपट्टीवरील लेखनास प्रादेशिक म्हटले आहे. पण त्यातली माणसे जे जीवन जगतात त्या जगण्यातून, सामाजिक अंगातून प्रादेशिकता ध्वनित होत असते. प्रादेशिकता म्हणजे विशिष्ट हिरव्यागार, नयनरम्य भूप्रदेशाचे चित्रण नव्हे. या प्रादेशिकतेलाही विविध कंगोरे असतात. त्या अर्थाने माझ्या कथाही प्रादेशिक म्हणता येतील. नद्या, नाले, राई, पर्वत, सागर, द-या-डोंगर इत्यादींचे प्रत्ययकारी चित्रण म्हणजे प्रादेशिकता नव्हे. तर प्रादेशिकता ही प्रदेशसापेक्ष - सामूहिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांतूनही सिध्द होत असते.

11. प्रादेशिक म्हणवला जाणारा लेखक हा प्रामुख्याने "ग्रामीण जाण" नजरेसमोर ठेऊन कथालेखन करतो? की "प्रादेशिक जाण" नजरेसमोर ठेऊन कथालेखन करतो?

एखादी विशिष्ट जाण-जाणीव-भूमिका आधी नक्की करून लेखक लेखन करीत नसतो. त्याला भावतो तो उत्कट अनुभव व खोल रुतून बसलेली पात्रे.

जीवनाशी निगडीतच असणार· त्यामुळे सारे लेखन ग्रामीण स्वरूपाचेच आहे· माझ्या नागर कथेत देखील ग्रामीण जीवनातल्या पात्रांचे, अनुभवांचे दर्शन घडते, तेच चित्रण आलेले असते·

7· आपल्या कथा या ग्रामीणतेपेक्षाही प्रादेशिक ठरतात याबाबत आपले मत काय आहे?

माझ्या कथा या ग्रामीण कथा आहेतच, त्याबरोबरच किंबहुना अधिक प्रमाणात, त्या प्रादेशिक आहेत· कारण - 1· माझ्या कथा या एका विशिष्ट प्रदेशाचे ‌(सांगोला परिसराचे) चित्रण करतात· उदा· माडगूळकरांच्या कथेत माणदेशाचे चित्रण आलेले असते·परंतु समृध्द निसर्ग चित्रण त्यात आढळत नाही· 2· तुम्हाला कथेतून माणदेशाचा प्रत्यय आणून दिलेला असतो· पण प्रादेशिकता ही सामाजिक जीवनाच्या अंगाप्रत्यंगाद्वारेही प्रकट होत असते· शेतीभाती, कपडे, सणसोहळे, परंपरा, श्रध्दा, धारणा, पिके, मानसिकता, भाषा, दैवते, संस्कार इ· गोष्टी द्वारेही एखाद्या विशिष्ट प्रदेशातली प्रादेशिकता कथेत किंवा कादंबरीत येऊ शकते· माझ्या कथेतही या दुस-या प्रकारे प्रकट झालेली प्रादेशिकता जाणवते·

माझ्या कथेतील माणसांवर प्रदेश व परिस्थिती नियमन करीत असते· त्या प्रदेशातून साकार झालेल्या जीवनाचा, परिस्थितीचा स्वीकार करूनच पात्रांना जगावे लागते· त्या प्रदेशाशी व परिस्थितीशी तडजोड करीत त्यांना जगावे लागते· त्यातून त्यांचे जगण्याचे स्वरूप निश्चित होते, जीवनधारणा नक्की होते· जीवनाकडे पाहण्याचा विचार नि दृष्टीकोन निश्चित होतो· परिस्थिती त्याला घडवीत असते, बिघडवीत असते, वाकवत असते· म्हणून माझ्या, या कथा प्रादेशिकच म्हणता येतील· माझ्या सर्वच कथांमधून ही प्रादेशिकता - भाषा, प्रसंग, पात्रे, निवेदन, नाट्य, सामाजिकता व सांस्कृतिकता यांतून अवतरत असते·

8· कथावाड्मयाकडून वाचकाने कोणत्या अपेक्षा करायला हव्यात?

कथावाड्मयाकडून वाचकाने केवळ दोन घटका करमणूक करण्याची, मनोरंजनाची अपेक्षा बाळगू नये· सखोल व नाविन्यपूर्ण असे जीवनदर्शन घडावे, जीवनाचा एखादा अलक्षित पैलू नजरेत यावा· मानवी स्वभावाचे अनोखे दर्शन

हे व्यक्त करण्यासाठीच तो लेखन करीत असतो· त्या अनुभवाची प्रकृती व पात्रांचे "जगणे-वागणे" प्रकट करीत असतानाच त्याला प्रादेशिकतेची वा ग्रामीणतेची डूब प्राप्त होत असते· लेखक कशावर भर देतो व काय व्यक्त करतो· यातून त्या लेखनाला आकार प्राप्त होत असतो· त्याला रूप प्राप्त होत असते·

12· आपले वाड्.मयीन व्यक्तिमत्त्व (पिंड) कसे घडत गेले?

वाचन, लेखन, चिंतन व संस्कार यातून वाड्.मयीन व्यक्तिमत्त्व घडत गेले· एका विशिष्ट काळात आदर्श, सेवाभावी, त्यागी, निष्ठावान, कलाप्रेमी अशी माणसे भेटली, अंतःकरणावर परिणाम करत गेली· जोडीस उद्‌बोधक वाचन होत होतेच· त्याद्‌वारेही वाड्.मयीन संस्कार होत गेले· तसेच वाड्.मयप्रेमी मित्रांच्या समवेत केलेल्या साहित्यविषयक चर्चा उपयोगी पडल्या· शिवाय "प्रत्यक्ष जगणे" आपला पिंड घडविते· आपली जीवनधारणा तयार करते· या प्रत्यक्ष जगण्यातूनही वाड्.मयीन व्यक्तिमत्त्वाला जीवनरस प्राप्त झालेला असावा· त्यामुळेच माझ्या कथांमध्ये चाकूचोथा झालेली प्रेमप्रकरणे आढळणार नाहीत· बाई, बाटली, तमाशा, भानगडी यांचा मालमसाला सापडणार नाही· कामभावनेला चाळविणारी शृंगारचेष्टिते दिसणार नाहीत· वा अद्‌भूतता, विस्मयजनकता पाहावयास मिळणार नाही, या सा-यांचे कारण वाड्.मयीन व्यक्तिमत्त्वाचा विशेष असेच म्हणावे लागेल·

# संदर्भ - ग्रंथ - सूची

## संदर्भ - ग्रंथ - सूची


1· "ग्रामीण कथा रूप आणि परिसर" : म·द·हातकणंगलेकर, सुवर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च 1986·

2· "प्रदक्षिणा" : कथावाङ्मय - म·ना·अदवंत, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती 1968·

3· "खडक आणि पाणी" : नवकथा स्वरूप आणि आक्षेप - गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन - मुंबई, दुसरी आवृत्ती - 1966·

4· "आवड निवड" - स·गं·मालसे, मॅजेस्टीक बुक स्टॉल - मुंबई, प्रथमावृत्ती जानेवारी 1959·

5· "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या" - आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, तृतीयावृत्ती, जुलै 1993·

6· "ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव" - आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, प्रथमावृत्ती मे 1981·

7· "ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास - डॉ·वासुदेव मुलाटे, साहित्यसेवा प्रकाशन - औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी 1992·

8· "आनंद यादव : व्यक्ति आणि वाङ्मय" - डॉ·रविंद्र ठाकूर, मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, प्रथमावृत्ती जुलै 1993·

9· "मराठी कथा : उगम आणि विकास" - इंदूमती शेवडे, सोमैय्या प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती 1973·

10· "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध" - नागनाथ कोत्तापल्ले, मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, प्रथमावृत्ती 4 जानेवारी 1985·

11· "सुगी" या ग·ल·ठोकळांच्या जानपद गीतसंग्रहाची प्रस्तावना - वि·स·खांडेकर, आत्माराम प्रकाशन, बडोदे, 1933·

12· "आशय आणि आविष्कार" - प्रल्हाद वडेर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च 1988·

13· "मायलेकरं" या आनंद यादवांच्या पुस्तकाची प्रस्तावना - अरविंद वामन कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी 1989·

14· " बहिणाईची गाणी" मधील "मानूस" कविता - बहिणाबाई चौधरी, संपादक - प्र·के·अत्रे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती 1978·

15· "झोंबी" - आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, पाचवी आवृत्ती नोव्हेंबर 1994·

16· "तिस-यांदा रणांगण" - द·भि·कुलकर्णी, विजय प्रकाशन, नागपूर, 1976·

17· "आजच्या मराठी साहित्यातील प्रादेशिकता" - श्री·मा·कुलकर्णी/गो·रा·दोडके, मौज (साप्ताहिक), 21 एप्रिल 1957·

18· "ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव" या आनंद यादवांच्या पुस्तकाची प्रस्तावना - स·शि·भावे, मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, प्रथमवृत्ती मे 1981·

19· "ग्रामीण साहित्य : एक चिंतन" - द·ता·भोसले, मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, प्रथमावृत्ती, 1988·

20· "मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप" - मदन कुलकर्णी, श्री·मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 16 जून 1984·

21· "बनगरवाडी : एक आस्वाद" - कृ·ब·निकुम्ब, वैखरी (नियतकालिक), एप्रिल ते सप्टेंबर 1972·

22· "अनुभूती आणि अभिव्यक्ती" - भ·प्र·मोहरीर, विदर्भ साहित्य प्रकाशन माला - अमरावती, 1958·

23· "एकोणिसशे साठ नंतरची ग्रामीण कादंबरी" - रत्नाकर बापूराव मंचरकर, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, डिसेंबर 1980·

24· "प्रतिष्ठान" (नियतकालिक) - स·रा·गाडगीळ, फेब्रुवारी मार्च एप्रिल 1964·

25· "तुकारामांचे निवडक अभंग" - संपादक श्री·म·पिंगे व गजमल माळी, व्हीनस प्रकाशन - पुणे, दुसरी आवृत्ती मे 1978·

26· "उखडलेली झाडे" - आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस - पुणे, प्रथमावृत्ती 10 एप्रिल 1986·

27· "गजरा" - भाऊ मांडवकर, सेवा प्रकाशन - अमरावती, 1971·